नि. फौ.ख.क्रं. ५/२०१८
शासन वि. अनिल
नि.क्र. ४७/क

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०१ यांची शपथेवर जबानी**

नाव : मनिषा संतोष म्हस्के

वय : ३४ वर्षे

व्यवसाय : नोकरी

राहणार : दादेगाव ता. आष्टी जि. बीड

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत**

१. माझ्या घरी सासु–सासरे, दीर–जाव असतात. आरोपी शेजारी राहत असल्याने मी त्यांना ओळखते. आरोपी क्र. २ आज न्यायालयात हजर आहे. नि. ४६ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र. १ यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर. घटना दि. २०/०८/२०१७ रोजी घडली. त्यादिवशी आरोपींनी त्यांच्या दारात साचलेले पावसाचे पाणी आमच्या दारात काढुन दिले. त्यामुळे माझी सासुने आरोपींना त्याबाबत विचारले असता, ५ वाजण्याच्या सुमारास आरोपी क्र. १ व २ तेथे आले व त्यांनी माझ्या पतीला मारहाण केली. मी भांडणे सोडवण्यासाठी गेले असता, आरोपी क्र. १ ने दगडी वरंवटा फेकुन मारला तो माझ्या नाकाच्या उजव्या बाजुला लागला. त्यानंतर मी बेशुध्द पडले. शुध्दीवर आल्यानंतर अंभोरा पोलीस स्टेशनला गेले. पोलीसांनी जखम झाली असल्याने आष्टी सरकारी दवाखान्यात पाठवले. तेथे जाऊन टाके घेतले. त्यानंतर त्यांनी गंभीर जखम असल्याने अ.नगर येथे सरकारी दवाखान्यात पाठवले. त्याच दिवशी मी अ.नगर येथे दवाखान्यात गेले, तेथे दोन दिवस उपचार घेतले व क्ष–किरण काढला. त्यानंतर दि. २२/०८/२०१७ रोजी अंभोरा पोलीस स्टेशनला गेलो व आरोपी विरुध्द फिर्याद दिली. आता मला जबाब/फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यावर माझा सही आहे. फिर्यादीस **नि.पी-४८/पीडब्ल्यु-१** देण्यात येते.

०२. मला आरोपीने ज्या वरंवट्याने मारहाण केली होती ते दाखवल्यास मी ओळखु शकते. साक्षीदारास जी.एम.पी. क्र. २३/२०२५ मध्ये दगडी वरंवटा दाखवण्यात आला. साक्षीदाराने तोच असल्याचे ओळखले. मुद्देमालास **नि. एम.ओ. -१** देण्यात येते. त्यानंतर पोलीस पंचनाम्यासाठी घरी आले. घटनास्थळ माझ्या पती संतोष म्हस्के यांनी दाखवले. तेथे पंच भाऊसाहेब गिते व बाबासाहेब म्हस्के हजर होते. पोलीसांनी घटनास्थळाचे फोटो काढले. साक्षीदारास घटनास्थळाचे ६ फोटो दाखवण्यात आले. फोटोमध्ये माझे पती आहेत तसेच वरंवटा पडलेला दिसतो. फोटोमध्ये माझी व आरोपीची घरे आहेत. फोटोस अनुक्रमे **नि. एम.ओ. २ ते ७** देण्यात येते. अ.नगर येथे क्ष-किरण काढलेबाबत माझ्याकडे फोटो आहे. ते मी दाखल करु शकते. घटनेनंतर देखील आरोपी मला शिवीगाळ करतात व त्रास देतात.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी.व्ही. दाणी यांच्यातर्फे उलटतपास सुरु.**

०३. माझे बी.ए. पर्यंत शिक्षण झाले आहे. मी दादेगाव येथे अंगवाडी शिक्षीका म्हणुन २०१६ पासुन कार्यरत आहे. आरोपी क्र. १ माझा शेजारी आहे. आरोपी क्र. २ कडा येथे महाविद्यालयात शिक्षक आहे. अमान्य की, ते कडा येथे राहतात. अमान्य की, घटनेच्या दिवशी आरोपी क्र. २ शाळेवर होते. अमान्य की, आरोपी क्र. २ चे घर शेजारी नाही. हे म्हणणे खरे आहे की, पाणी उताराच्या दिशेने जाते. अमान्य की, पावसाच्या पाण्यावरुन वाद झाला हे खोटे सांगत आहे. माझ्या घरी एकुण ९ माणसे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गावामध्ये आमचे मोठे कुटुंब असल्यामुळे आमचे गावात वजन आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती ग्रामपंचायत उमेदवार पदासाठी उभे होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ त्यांच्या विरुध्द उभा होता. अमान्य की, एकमेकांच्या विरुध्द उभे असल्याने सदरची खोटी केस केली.

०४. अमान्य की, भांडणे चालु असतांना सोडवण्यासाठी गेल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, वरंवट्यामुळे नाकाला मार लागल्याचे खोटे सांगत आहे. अमानय की, सरतपासात नमुद मजकुर खोटा सांगितला आहे. अमान्य की, पंचनाम्याच्या वेळेस मी हजर नव्हते. अमान्य की, माझ्यासमक्ष पंचनामा केला नाही. अमान्य की, पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नाही. मला जखम असल्यामुळे फिर्याद देण्यासाठी २ दिवस उशीर झाला. अमान्य की, आरोपी क्र. १ विरुध्द तक्रार नाही. अमान्य की, त्यांच्यासोबत तडजोड करण्यास तयार आहे. अमान्य की, निवडणुकीस उभे राहिल्याने वाद झाला व त्यामुळे खोटी केस केली. अमान्य की, आरोपी क्र. २ शिक्षक असल्याचे सहन होत नाही. त्यामुळे खोटी केस केली. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.१४.१०.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2025.10.15 10:50:55 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी